महाराष्ट्र शासन

**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१

w'site : www.dydepune.com
e-mail: 11thonlineadmissiondydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

## पुणे व पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया-२०१९-२०

--------------------

## प्रसिध्दी निवेदन दि.२४.०५.२०१९

**इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाचे कामकाज पुणे, मुंबई सह नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपूर या महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय दि. ०७.०१.२०१७ व ०७.०३.२०१९ अन्वये सुरु करण्यात आलेले आहे. सन २०१९-२० साठीच्या इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेंतर्गत कनिष्ठ महाविद्यालयांची नोंदणी संगणक प्रणालीवर करण्यात आलेली आहे.**

**शासनाचे पत्र जावक क्र-प्रवेश-२०१८/प्र.क्र.३३३/एसडी-२ दि.२४.०५.२०१९ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१९-२० साठी विद्यार्थ्यांची संगणक प्रणालीवर नोंदणी सुरु करण्यासाठी दि.२७ मे २०१९ पासून शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार या कार्यालयाने दि.२२ व २३ मे २०१९ रोजी विद्यार्थी व पालकांसाठी इ.११वी ऑनलाईन प्रवेश अर्ज ऑनलाईन प्रणालीमध्ये कशाप्रकारे भरावा याचे उद्बोधन वर्ग आयोजित करण्यात आलेले होते. तसेच इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१९-२० ची माहिती पुस्तिका झोननिहाय वितरित करण्यात आलेल्या असून एसएससी बोर्डाच्या परिक्षेस प्रवेशित विद्यार्थ्यांना त्याच्या इ.१० वी माध्यमिक शाळेत सदर माहिती पुस्तिका उपलब्ध करुन देण्यात देण्यात आलेल्या आहेत.माहितीपुस्तिकेत विद्यार्थ्यांसाठी लॉग-इन आयडी व पासवर्ड उपलब्ध करुन दिलेला आहे, त्याचा वापर करुन विद्यार्थ्यांसाठी इ.११ वी ऑनलाईन प्रवेश अर्जाचा भाग-१ भरण्याची सुरुवात सोमवार दि.२७ मे २०१९ सकाळी ११.०० वाजलेपासून होत आहे.**

सदरचे प्रसिध्दीनिवदेन या कार्यालयाच्या **www.dydepune.com** व इ.११वी ऑनलाईन प्रवेशाच्या **http://pune.11thadmission.net** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**(मिनाक्षी राऊत)**
**प्र.शिक्षण उपसंचालक**
**पुणे विभाग पुणे-१**

Scanned by CamScanner